(1)

महाराष्ट्र शासन

सहसंचालक (उच्च शिक्षण)
१७ आंबेडकर रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१
Website: www.jdhepune.info E-mail –admin@ jdhepune.info

दूरध्वनी क्रमांक – ०२० - २६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स क्र. ०२०- २६०५१६३२

जा.क्र.ससं/उशि/पुवि/स्वच्छ भारत अभियान/२०१४/5165 दिनांक १.१०.२०१४

प्रति,

१. कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे.
२. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
४. कुलसचिव, डेक्कन कॉलेज व पदव्युत्तर संस्था, येरवडा, पुणे – ६
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे.
६. प्राचार्य / प्राचार्या, सर्व अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये, **पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हे.**

विषय- महात्मा गांधी यांचा जन्मदिवस दि. २.१०.२०१४ पासून स्वच्छ भारत अभियान सुरु करणेबाबत व ऑक्टोबर महिन्यामध्ये त्याची अंमलबजावणी करणेबाबत..

संदर्भ - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. ममअ-२०१४/स्वच्छता अभियान/संकीर्ण/प्रशा-१/८२७७ दिनांक ३०.९.२०१४.

महोदय,

उपरोक्त विषयाचे मा. संचालनालयाचे संदर्भिय पत्र व सहपत्रे सोबत जोडलेली आहेत.

संदर्भिय पत्रान्वये मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांनी आदेशित केल्यानुसार स्वच्छ भारत अभियान योजनेची अंमलबजावणी दिनांक २ ऑक्टोबर २०१४ पासून करण्यात यावी. यासाठीच्या आवश्यक त्या मार्गदर्शक सूचना सोबत जोडलेल्या परिपत्रकात दिलेल्या आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही करुन दिनांक १ नोव्हेंबर २०१४ रोजी सदरचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(डॉ.एस.एस.शेटे)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे १

सोबत –

१. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांचे परिपत्रक.
२. मा. सचिव, मानव संसाधन व विकास मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांचे परिपत्रक.
३. मा. सहसचिव, मानव संसाधन व विकास मंत्रालय, उच्च शिक्षण विभाग, भारत सरकार नवी दिल्ली यांचे परिपत्रक.

(2)

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य,
मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१
Web : www.dhepune.gov.in, E-Mail : dhepune@yahoo.co.in
फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११५३

क्र.ममअ-२०१४/स्वच्छता अभियान/संकीर्ण/प्रशा-१ / ८२५७ दिनांक.३०.०९.२०१४

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण
सर्व कुलसचिव,
अकृषि विद्यापीठे



विषय : महात्मा गांधी यांचा जन्मदिवस दि.०२.१०.२०१४ पासून स्वच्छ भारत अभियान सुरु करणेबाबत व ऑक्टोबर महिन्यामध्ये त्याची अंमलबजावणी करणेबाबत..

संदर्भ : डॉ.आर.मनोजकुमार, उपसचिव व मुख्य, विद्यापीठ अनुदान आयोग पश्चिम विभागीय कार्यालय, गणेशखिंड, पुणे यांचे दिनांक.२६.०९.२०१४चे व या कार्यालयास दिनांक.३०.०९.२०१४ रोजी प्राप्त झालेले पत्र

उपरोक्त विषयासंबंधी प्राप्त झालेले संदर्भिय पत्र व या पत्रासोबतचे श्री.अशोक ठाकूर, सचिव महोदय, मानव संसाधन विकास मंत्रालय, उच्चतर शिक्षा विभाग यांचे सर्व संस्थांना उद्देशून लिहिलेले दि.२१.०९.२०१४ चे पत्र तसेच श्री.आर.पी.शिसोदिया, सहसचिव, भारतसरकार, मानव संसाधन विकास मंत्रालय, उच्चतर शिक्षा विभाग, शास्त्री भवन, नवी दिल्ली यांचे अ.शा.पत्र क्र.१८-६१/२०१४-यू१ए दि.२३.०९.२०१४ चे पत्र या सोबत जोडलेले आहेत. सदरची दि.२१.०९.२०१४ व दि.२३.०९.२०१४ ची पत्रे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या www.ugc.ac.in या वेबसाईटवर Notices@UGC या लिंकमध्ये ११ क्रमांकावर आहेत, ती पहावीत व डाऊनलोड करुन घ्यावीत व या पत्रानुसार आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व शैक्षणिक संस्थांना/महाविद्यालयांना यानुसार स्वच्छ भारत अभियान राबविणेबाबत इ-मेलद्वारे आपले स्तरावरुन कळविण्यात यावे. कोणत्याही परिस्थितीमध्ये दिनांक.०२.१०.२०१४ पासून स्वच्छ भारत अभियान सुरु करावे. स्वच्छ भारत अभियान किमान ३० ऑक्टोबर २०१४ पर्यंत राबविणेचे आहे, स्वच्छ भारत अभियान

या अंतर्गत येणाऱ्या काही बाबींवर ३० ऑक्टोबर २०१४ पूर्वी कार्यवाही पूर्ण न झाल्यास त्यानंतरही सदरची कार्यवाही अभियान पूर्ण होईपर्यंत राबवावी.

स्वच्छ भारत अभियान योजना विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी विद्यापीठाचे कुलगुरू यांचेशी विचारविनिमय करून राबवावी तसेच सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य यांनाही याबाबत आपले स्तरावरून योग्य त्या सूचना देण्यात याव्यात. सदरची योजना राबविलेबाबतचा अहवाल शासनास सादर करावयाचा आहे. तरी सर्व कार्यवाहीची माहितीचा अहवाल दिनांक.०५.११.२०१४ पूर्वी सादर करावा. आज दिनांक.०१.१०.२०१४ रोजी सर्व महाविद्यालयांना दूरध्वनीद्वारे/ई-मेलद्वारे हे अभियान राबविणेची सूचना द्यावी.

1/10/2014

(डॉ.प्र.रा.गायकवाड)
प्र.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.